

# खडकवासला परिसरात स्वच्छता अभियान

पुणे, दि. २१ - खडकवासला रयत शिक्षण संस्थेच्या यशवंत विद्यालय, खडकवासला ग्रामपंचायत, पंख व क्विकहिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळांगण प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांमार्फत भैरवनाथ मंदिर येथे शाळा परिसर व मंदिर परिसर स्वच्छ करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मराठी अभिनेते व दिग्दर्शक सागरजी तळाशीकर उपस्थित होते. पोलीस निरीक्षक अशोक शेळके, सहाय्यक पोलीस निरीक्षक स्मिता पाटील, क्विकहिलचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के, जिल्हा परिषद सदस्य जयश्री पोकळे, खडकवासल्याचे सरपंच सौरभ मते, उपसरपंच पूनम मते, ग्रामविकास अधिकारी अरुण हेगडे, पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, ट्रस्टी कल्याणी भाबड, मुख्याध्यापिका विद्या पवार, संजय बांदल उपस्थित होते. सूत्रसंचालन पंख संस्थेच्या समन्वयक मैथिली बंडी यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन सचिन भापकर, मृणाल मापुस्कर, श्वेता सूर्यवंशी यांनी केले होते.